निर्भीड, निष्पक्ष, रोखठोक

तांदुळनगरी

ब्रेकिंग बातम्यांचे डिजिटल व्यासपीठ

दिनांक: 13 ऑगस्ट 2026 गुरुवार

सायबर गुन्ह्यांना ‘नो एंट्री’: रोडमार्क फाऊंडेशनमध्ये सायबर सुरक्षेचा धडा

तांदूळनगरी | नागपूर : क्विकहील फाउंडेशनच्या ‘सायबर सुरक्षा’ उपक्रमांतर्गत आणि शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था नागपूर यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या ‘सायबर शिक्षण’ जनजागृती अभियानाचे महत्त्वपूर्ण सत्र ७ ऑगस्ट २०२६ रोजी रोडमार्क फाउंडेशन, नागपूर येथे पार पडले. या सत्रात शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्थेचे विद्यार्थी कुणाल मेश्राम आणि ऋतुजा गिरी यांनी सादरीकरण करून उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांना वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी मार्गदर्शन केले.



विविध सायबर फसवणुकींबाबत मार्गदर्शन

सादरीकरणादरम्यान व्हॉइस फिशिंग, स्मिशिंग, ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंकद्वारे होणारे हल्ले, सोशल मीडिया फसवणूक तसेच डिजिटल पेमेंट फ्रॉड यांसारख्या सायबर गुन्ह्यांचे प्रकार समजावून सांगण्यात आले. संशयास्पद फोन, संदेश व लिंकपासून सावध राहणे, वैयक्तिक माहिती कोणासोबतही शेअर न करणे आणि सुरक्षित पद्धतीने डिजिटल व्यवहार करणे याबाबत उपस्थितांना महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.

‘AntiFraudAI’ ॲपची माहिती

रोडमार्क फाउंडेशनमध्ये कार्यरत सामाजिक कार्यकर्त्यांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक करताना IFSC नागपूरच्या स्वयंसेवकांनी ‘AntiFraudAI’ ॲपची माहिती दिली. तसेच उपस्थितांच्या मोबाईलमध्ये ॲपची स्थापना करून त्याच्या वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ऑनलाइन फसवणुकीपासून नागरिकांना अधिक सजग राहण्यास या उपक्रमाची मदत होणार आहे.

कार्यक्रमात उपस्थितांनी सायबर सुरक्षेशी संबंधित विविध प्रश्न विचारून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. डिजिटल युगात नागरिकांनी तंत्रज्ञानाचा सुरक्षित व जबाबदारीने वापर करावा, यासाठी या जनजागृती अभियानातून महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

क्विकहील फाउंडेशन आणि शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारे ‘सायबर शिक्षण’ अभियान समाजात सायबर सुजाणीवकत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रभावी ठरत आहे.

अशाच ब्रेकिंग बातम्या व ताज्या घडामोडी जाणून घेण्यासाठी आपल्य व्हॉट्सॲपमध्ये 7218031819 ऍड करा.